बिजूने विणली जादू

जया जेटली
भ्रमर नायक



बिजूने विणली जादू



लेखन : जया जेटली

चित्रं : भ्रमर नायक

मराठी अनुवाद : संध्या टाकसाळे

जिलमिंडा - ओरिसातल्या संबळपूर जवळचं एक निवांत, धूळभरलं खेडं. उण्यापुऱ्या नऊ वर्षांचा बिजू. उन्हाळ्यातल्या भर दुपारी वडिलांची वाट बघत झाडाखाली बसला होता. तो आणि बाप्पा लांबच्या प्रवासाला निघणार होते.

त्याच्या कानाशी एक माशी गुणगुणायला लागली, उन्हाची तिरीप आणि शेजारच्या झोपड्यांमधून येणारा हातमागाचा खट-खट असा एका लयीतला आवाज यामुळे बिजूला झोप यायला लागली. सावलीला आलेल्या भुऱ्या कुत्र्यासारखी आपणही एक डुलकी काढावी, असं त्याला वाटलं. पण उन्हामुळे कुत्रा एवढ्या मोठ्यानं धापा टाकत होता की त्या आवाजात झोप येणं अशक्य होतं.

गावातल्या अनेक मुलांसारखा बिजूही शाळेत जात नव्हता. खरं तर त्याला जायचं होतं; पण आई-वडील म्हणाले की आपल्या विणकरांच्या व्यवसायाला ज्या शिक्षणाचा काडीचाही उपयोग नाही, ते का घ्यायचं? उलट, शिकलं की, ऑफिसात जाऊन काम करायचे नसते विचार डोक्यात येणार. नकोच ते. बिजूनंही स्वतःला पटवण्याचा प्रयत्न केला की, शाळेत मुळीच मजा येत नसणार, नाहीतर तिथे जाणारी मुलं एवढी का दुःखी दिसली असती? शिवाय त्यांना पुस्तकांचं केवढं ओझं वाहून न्यावं लागतं. त्याच्या एका मित्राच्या भावानं शिकून पदवी मिळवली खरी; पण नोकरी मिळण्यासाठी त्याचा काही उपयोग झाला नाही. मुंबईतल्या कित्येक उंच इमारतींच्या पायऱ्या त्यानं झिजवल्या; पण शेवटी हाती लागलं काय, तर चहाच्या टपरीवरचं काम, रखवालदाराची नाहीतर पेपरच्या स्टॉलवरची नोकरी! आता तो परत गावी येऊन वडिलांना इक्कत साड्या विणायला मदत करतो आणि कधीतरी मुंबईच्या ठोक व्यापाऱ्यांकडे त्या विकायला घेऊन जातो.



जेजी बापा म्हणजे आपल्या आजोबांकडून, बिजू थोडंसं लिहायला-वाचायला शिकलाय.

आजोबा जेव्हा एका शिक्षकांकडे कामाला होते, तेव्हा ते काही गोष्टी शिकले होते. कापसाच्या धाग्याच्या लडींचा गठ्ठा वापरून त्यांनी बिजूला अगदी सोप्या रीतीनं गणित शिकवलं. कधी सगळ्या निळ्या लड्यांची बेरीज करायची आणि पिवळ्या त्यातून वजा करायच्या तर कधी लाल दुप्पट करून हिरव्या काढून घ्यायच्या. बिजूला मजा यायची आणि काही काळ तरी तो शाळेचा विचार सोडायचा.

जेजी बापा जुन्या काळातल्या गमती बिजूला सांगायचे. पूर्वीच्या काळी त्याच्या गावात तयार झालेले सुंदर कपडे आणि इतर मौल्यवान वस्तू यांनी भरलेलं जहाज कसं दूऽरच्या इंडोनेशिया नावाच्या देशात 'बाली' इथं जायचं, त्याला 'बाली यात्रा' कसं म्हणायचे वगैरे. त्या काळातल्या अशा गोष्टी ऐकायला बिजूला फार आवडायचं. त्याला वाटायचं, गावात विणलेले सुंदर कपडे घेऊन आपणही असा दूर देशी प्रवास करावा.

कपडा विणण्यापूर्वी लांब धागे नीट आवळून ते रंगवणं ही अवघड कला ज्यांनी पूर्णत्वाला नेली, अशा विणकरांच्या परंपरेतले बिजूचे वडील आणि आजोबा होते. पण हे काम मुळीच सोपं नव्हतं. चिकाटीनं करावं लागायचं. बिजू, त्याची आई, बहिणी, चुलत भावंडं या सगळ्यांची मदत घेतली, तरच बाप्पाचं हव्या तेवढ्या लांबीचं कापड विणून व्हायचं आणि ते विकून कुटुंबाचा खर्च कसाबसा भागायचा. बिजू बहुतेक वेळेला आई आणि बहिणींबरोबर बसून, सुंदर झगमगत्या रंगांत रंगवलेले रेशमी धागे आसारीला म्हणजे रिळाला गुंडाळत बसायचा किंवा पिंजलेल्या कापसाच्या गोळ्यातून सूत कातायचा. झोपडीजवळच्या धूळभरल्या रस्त्याला लागून, रंगवलेले लांबच लांब धागे दोन खांबांमध्ये ताणून बांधायला वडिलांना मदत करायचा. परंपरागत पद्धतीनुसार बाप्पा धाग्यांच्या लडीला असमान अंतरावर गाठी मारून ते रंगवायचे आणि मग तिथे रंगाचे किंचित पसरलेले ठिपके तयार व्हायचे. असे रंगवलेले लांब धागे पत्र्याच्या शेडमध्ये नेऊन बाप्पा

9509



हातमागावर चढवत आणि मग विणायला सुरुवात होई. धागे गुंडाळलेल्या कांडीचा दांडा मागे-पुढे करत बाप्पा जेव्हा विणायला लागत, तेव्हा बिजू गुंगून, संमोहित झाल्यासारखा बघत राही, तयार झालेला कपडा धातूच्या फणीला गुंडाळून दुसऱ्या बाजूनं उमटणारी नक्षी बाप्पा काळजीनं नीट बघे, कुठे काही दोष राहून गेला नाही ना यासाठी. मागे-पुढे, मागे-पुढे दांडा हलत राही आणि शेवटी झकास इक्कत साडी आकाराला येई. दोन्ही बाजूंना झगमगते काठ आणि शेवटी तो गच्च भरजरी पदर. तयार झालेलं कापड, आई आणि बहिणीच्या मदतीनं बिजू गुंडाळून, गच्च दाबून ठेवत असे. त्याची घट्ट घडी तयार होई. आता ती उघडायची, फक्त गिऱ्हाइकाला दाखवायला.

बिजूला नेहमी नवल वाटायचं की, बाप्पानं तयार केलेल्या या इतक्या सुंदर रेशमी साड्या आई का कधी नेसत नाही? त्या फक्त लांबच्या शहरातच का जातात? दर वर्षी दसऱ्याला आई फक्त दोन सुती साड्या घ्यायची, त्याही शहरातल्या कापड गिरणीत तयार झालेल्या. एकदा बिजूनं आईला हे विचारलं तर आई फक्त हसली आणि म्हणाली, ''हे बघ, तू किंवा तुझे बाप्पा श्रीमंत झालात ना, की नेसेन हं तसल्या साड्या मी!''

बिजू बाळा, ऊठ. निघायचंय ना आपल्याला? बाप्पानं बिजूच्या डोक्यावर थोपटलं, तसा बिजू तंद्रीतून एकदम जागा झाला. ''निरोप घेतलास का जेजी बाप्पाचा आणि आईचा?''

'हो, हो' असं म्हणत चटकन बिजूनं बाप्पाच्या हातातलं कपड्यांचं एक मोठं गाठोडं आपल्या हातात घेतलं. विकायच्या साड्यांची दोन गाठोडी आणि घालायच्या कपड्यांची एक छोटी पिशवी खांद्याला, एवढंच त्यांचं सामान होतं.

आता आपण मोठे झालो, अशी सुखद जाणीव बिजूला झाली. तो बाप्पाबरोबर दिल्लीला निघाला होता, साड्यांची गाठोडी उचलायला मदत करणार होता. या साड्या संबळपूरमधल्या ठोक विक्रेत्याला किंवा शहरातल्या एखाद्या मोठ्या व्यापाऱ्याला विकण्याऐवजी जर थेट ग्राहकाला विकल्या तर चांगली किंमत मिळेल, असं बाप्पा म्हणत होते.

बिजू पहिल्यांदाच मोठ्या शहरात निघाला होता. खरं तर बिजूला प्रवासाचा अनुभव मिळावा म्हणून जेजी बाप्पानंच 'त्याला दिल्लीला घेऊन जा' असा आग्रह धरला होता. म्हणजे पुढे-मागे बाली यात्रेला जायची वेळ आली तर उपयोग होईल. बिजूला खूप उत्साही वाटत होतं. पण मनात थोडी भीतीही होती.

जेमतेम सावली देणाऱ्या बस स्टँडपर्यंत दोघं चालत चालत आले. खूप वेळ थांबल्यावर एक जुनी, खटारा बस आली आणि त्यांना संबळपूरला घेऊन गेली. तिथून त्यांनी दिल्लीच्या निजामुद्दीन स्टेशनला जाणारी हिराकुड एक्सप्रेस पकडली. रेल्वेचा प्रवास मजेचा होता; पण गाडी एवढी खचाखच भरली होती की बिजूला रात्रभर बाप्पाच्या खांद्यावर डोकं टेकून झोपावं लागलं. बाप्पा मायेनं त्याला म्हणाले, ''येताना एवढा त्रास नाही होणार बरं बिजू, एकदा साड्या विकल्या गेल्या की थोडे पैसे आपल्याकडे असतील. आधी तिकीट काढून आरामात येऊ.''

यावर बिजू काही बोलला नाही. एकाच वेळी तो थकला होता, घाबरला-बावरला होता आणि भूकही लागली होती. गाडी थांबल्यावर जेव्हा बाप्पा खाली उतरायचे, तेव्हा दर वेळी त्याला सावध करून जायचे. ''बिजू, आपल्या गाठोड्यांवर लक्ष ठेव. त्यावर बस, टेक काहीही कर. ती जर चोरीला गेली तर आपलं सगळं संपलं.'' गाठोड्यांवर असं लक्ष ठेवताना बिजूला आपण खूप महत्त्वाचे आहोत असं वाटे; पण त्याच वेळी पोटात भीतीचा गोळा असायचा, की समजा गाडी सुटली आणि बाप्पा आलेच नाहीत तर? तर तो एकटा काय करेल? बहुधा गाडी सुटता-सुटताच बाप्पा हातात गरम-गरम भजी आणि कुल्हडमध्ये चहा घेऊन आलेले दिसायचे, तेव्हा कुठे बिजूचा जीव भांड्यात पडायचा. मग पुढे भीतीनं तो वडिलांना सांगत राहायचा की त्याला मुळीच भूक किंवा तहान लागलेली नाही.

दिल्लीला जेव्हा ते पोहोचले, तेव्हा गाठोड्यांचा ताबा वडिलांनी घेतला आणि बिजूनं पिशवी. स्वच्छ धुतलेल्या कपड्यांचा एक-एक जोड, दात घासायला लिंबाच्या काड्या,

9509



गमछा आणि एक जुनी पत्यांची डायरी एवढंच पिशवीत असल्यानं ती हलकी होती. टॉवेल, हातरुमाल, डोक्याला बांधायचा रुमाल अशी सगळी कामं त्या एका गमछ्यानंच होणार होती. कुठे थांबायला लागलं, तर रिकामं बसण्यापेक्षा हात चालू राहील या हेतूनं बाप्पा पिशवीत नेहमीच एक टकळी आणि कापसाचा गोळा ठेवत असत. रिकामं मन म्हणजे सैतानाचं घर, असं ते नेहमी म्हणायचे.

बिजूचे काका भवानी प्रसाद मेहर यांच्या घरापर्यंत त्यांनी स्टेशनपासून रिक्षा केली. मालवीय-नगर जवळच्या एका गजबजलेल्या रस्त्यावर हे घर होतं. रस्त्यावरच्या दिव्यांचा झगमगाट बघून बिजू इतका चकित झाला कारण त्यांच्या अख्ख्या गावाचा मिळून एवढा प्रकाश पडला नसता. मोठ्या दुकानांच्या काचेतून दिसणाऱ्या जरी-अरी काम केलेल्या साड्या, चमचमत्या ओढण्या, फ्रीज, टीव्ही आणि इतर लहान-मोठ्या अनेक आकर्षक वस्तू बिजू पहिल्यांदाच बघत होता. एका दुकानात टीव्ही चालू होता. बिजूनं लगेच ओळखलं, -अरे, हा तर अमिताभ बच्चन. लोकांचा आवडता हिरो. आपल्या गावातली पोरं तर त्याच्यासारखे केसही कापून घेतात. शेजारच्याच दुकानात सळईला तंदूर चिकन टांगलेलं होतं. ते लटकणारं चिकन दिसत होतं अगदी कसंतरीच; पण खमंग वास मात्र दरवळत होता. साड्या विकून चांगले पैसे मिळाले तर बाप्पा कदाचित घेऊनही देईल त्याला चिकन. त्याच्या शेजारीच भवानीदादाचं मेकॅनिकचं दुकान होतं. बाप्पा म्हणत होते, दिल्लीत आपल्याला दोन दिवस टेकायला तरी जागा मिळते आहे, हे नशीब.

दुसऱ्या दिवशी बिजू जरा उशिराच उठला. तोवर भवानीदादा आणि बाप्पा साड्या कुठे कुठे विकता येतील याविषयी चर्चा करत होते. बाप्पानं पत्ता, तिथे कसं पोहोचायचं यासाठी आजूबाजूच्या खुणा नीट लिहिलेला कागद घेतला. आपल्याला बसवरच्या आणि रस्त्यावरच्या पाट्या वाचता आल्या असत्या तर किती बरं झालं असतं, असं बिजूला फार वाटून गेलं.

मग ते एका बसमध्ये बसले. बाप्पा आपल्याच विचारात दंग होते, बाजूच्या कोणत्याच

गोष्टीकडे त्यांचं लक्ष नव्हतं. बिजू रस्त्यावरची गर्दी, गडबड, माणसं बघत होता. इतकी माणसं आसपास असताना प्रत्येक जण इतका बेफिकीर आणि स्वतःमध्येच गुंतलेला कसा? बिजूला वाटलं, आपण जर या शहरात हरवलो तर रस्ता, घर कसं सापडेल?

शेवटी एकदाचे ते बसमधून उतरले. कित्येक तास आपण प्रवास केलाय, असं बिजूला वाटत होतं. मग एका सावलीच्या रस्त्याने अंदाजे दोन किलोमीटर चालल्यावर ते एका आलिशान घराशी पोहोचले. गेटवरच्या रखवालदाराने आत कुणाला तरी फोन केला. थोड्या वेळाने एक माणूस त्यांना घराच्या मालकिणीकडे घेऊन जाण्यासाठी आला. घराच्या दाराशी पोहोचल्यावर या दोघांनी नेहमीप्रमाणे चपला बाहेर काढल्या. पण त्यांना आत घेऊन जाणाऱ्या माणसानं मात्र आपले मोठे काळे बूट तसेच ठेवले. मोठमोठ्या खुर्च्या, त्यावरच्या मऊ-मऊ उशा यांनी सजलेल्या त्या मोठ्या खोलीत त्यांना खाली गालिच्यावर बसायला सांगून तो माणूस निघून गेला. थोड्या वेळात बिजूपेक्षा थोड्याशाच मोठ्या वयाचा एक मुलगा आला आणि त्यांच्याकडे बघत-बघत पुन्हा आत पळाला. आईला हाका मारल्या आणि म्हणाला, ''आई, दोन गाठोडी घेऊन कुणीतरी आलंय ग!''

आणि मग तो आईबरोबर पुन्हा बाहेर आला. बिजूनं गाठोडी सोडायला बाप्पाला मदत केली आणि एकापाठोपाठ एक साड्या उलगडल्या. बघता-बघता गालिचा तऱ्हतऱ्हेच्या रंगीबेरंगी, झगमगत्या रेशमी आणि सुती साड्यांनी भरून गेला. जणू काही खोलीत इंद्रधनुष्य उतरलंय आणि त्याचे सगळे रंग एकमेकांत मिसळून गेलेत.

''हा बघा पदर.. अगदी पारंपरिक कामगिरी,.. आणि या साडीचा नमुना तर परदेशी डिझाइन दिल्यानुसार केला आहे... हे बघा अस्सल रेशीम... त्या साडीला राष्ट्रीय पारितोषिक मिळालंय...

प्रत्येक साडी कशी अगदी खास आहे हे बाप्पा रंगवून सांगत होते. साडी नेसल्यावर कशी दिसेल हे कळावं म्हणून बिजू हरएक साडी बाप्पाच्या खांद्यावर उलगडून टाकत होता. आपली आई साड्या कशी बघते, हे तो मुलगा टक लावून बघत होता. पण लवकरच

तो कंटाळला आणि त्यानं विचारलं, आई-मी या मुलाला माझ्या खोलीत खेळायला नेऊ?

आईनं वर न बघताच नुसतं डोकं हालवलं. एवढ्या साड्या दाखवणाऱ्या बाप्पांना आपली मदत लागेल, असा विचार करत बिजू मात्र तिथेच बसून राहिला. कदाचित बाप्पा आपल्याला जा म्हणतील, म्हणून त्यानं त्यांच्याकडे बघितलंही. पण ते गप्पच होते. शेवटी बिजूला नाहीच राहावलं आणि या मोठ्या शहरातल्या एका बड्या घरच्या छोट्या मुलाची मोठ्ठी खोली बघायला तो त्याच्या मागोमाग गेला.

''नाव काय तुझं?'' त्या मुलानं विचारलं.

''ब्रिजेश्वर प्रसाद मेहर,'' बिजू हळूच म्हणाला.

''आणि तुझं?''

''बबल्स'' तो मुलगा म्हणाला.



बबल्सची खोली तऱ्हतऱ्हेच्या रंगीबेरंगी खेळण्यांनी, यंत्रांनी खच्चून भरली होती. बिजू तर चकितच झाला. एका मोठ्या प्लॅस्टिकच्या बॉलवर बसून खोलीभर कसं हुंदडायचं, हे बबल्सनं त्याला शिकवलं. एका मोठ्या कापडी अस्वलाच्या पोटाला किल्ली होती. ती दिली की ते बोलू लागायचं. मालवीय-नगरच्या दुकानात बघितलेल्या

टीव्हीसारख्या दिसणाऱ्या कम्प्यूटरवर बबल्सने इतके गेम्स दाखवले की विचारता सोय नाही.

तिथे एक सायकल होती. पण बबल्सनं बिजूला ती चालवायला काही दिली नाही. घंटी मात्र वाजवायला दिली. जवळ जवळ सगळीच खेळणी विजेवर किंवा यंत्रावर चालणारी होती. बिजूच्या घरी तर वीजच नव्हती त्यामुळे त्या खेळण्यांशी खेळणं बिजूला अवघड गेलं.

केवढी अजब दुनिया होती ही. खेळण्यांची कमतरता नाही म्हणजे नाहीच. पण त्याहीपेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एवढं सगळं असूनही बबल्सला बिजूबरोबर खेळायचं होतं. पण बिचारा बिजू! इतक्या गोष्टींशी खेळणं तर लांबच; पण ती खेळणी त्याला नीट धरताही येत नव्हती. आपण अगदीच अडाणी आणि ढ आहोत, असं बिजूला वाटलं आणि या विचारानं त्याला स्वतःची अगदी लाज वाटायला लागली.

तेवढ्यात त्याची नजर कोपऱ्यात पडलेल्या एका चरख्यावर गेली. हं! आता हे कसं! चरखा तर बिजू अगदी आपल्या आई आणि बहिणीसारखा छान चालवायचा. बबल्सनं बिजूला विचारलं, ''तुला येतं हे चालवायला? मला माझ्या मामानं, लाल किल्ल्यावरच्या एका प्रदर्शनातून आणून दिलं. पण कसं खेळणार त्याच्याशी? मला तर यातलं ओ की ठो माहीत नाही.

मग काय? बिजूचा सगळा संकोच, भीड गळून पडली. मोठ्या आत्मविश्वासानं तो म्हणाला, ''याला चरखा म्हणतात. तुझ्याजवळ थोडा कापूस आहे?'' बबल्सनं 'नाही' अशी मान हलवली.

बिजू आपल्या वडिलांजवळ आला आणि त्या पिशवीत हात घालून काहीतरी शोधायला लागला. थोडा कापूस टकळी आणि थोडं सूत त्याला सापडलं. 'हं मिळालं.' तो पुटपुटला. पण बाप्पानं ते काही ऐकलं नाही. बाईसाहेबांना साड्या दाखवण्यात ते मग्न होते.

बबल्सच्या खोलीत येऊन, बिजूनं चरखा पुढ्यात ओढला आणि तो कताई करू

लागला. बघता-बघता पिंजलेल्या मऊ-मऊ कापसाचा आता सुंदर सुताचा धागा तयार होऊ लागला.

''अरे वा! तू तर जादूगारच दिसतोस'' असं आर्श्चयानं म्हणत मागचा-पुढचा विचार न करता बबल्सनं बिजूला चरख्यासमोरुन ढकललं आणि तो स्वतः तिथे बसला.

बिजूसारखीच कताई करण्याचा त्यानं प्रयत्न केला. पण कसलं काय? शिकल्याशिवाय थोडंच सूत कातता येणार? मग बबल्सनं अधिकारवाणीनं बिजूला म्हटलं, ''अरे मला परत दाखव जरा. कसं फिरवलंस तू हे?''

'जर हा मुलगा सूत कातू शकतो. मग मी का नाही' असा विचार करून बबल्सने किती वेळा प्रयत्न केला; पण ना कताई आली ना सूत तयार झालं.

बिजूच्या चेहऱ्यावर हलकं स्मित उमटलं ''हे बघ, हे असं करतात.'' त्यानं बबल्सला समजावलं.

शेवटी अर्ध्या तासाच्या अथक प्रयत्नांनंतर बिजूनं बबल्सला चरखा चालवायला शिकवलंच. तो म्हणाला, आमच्या गावाला असं सूत



हातमागावर चढवतात. आता त्याची आई बघत
असलेल्या सगळ्या सुंदर-सुंदर साड्या तशाच
तयार झाल्या आहेत, दूर ओरिसातल्या
संबळपूर जवळच्या जिलमिंडा गावात.
बबल्स विचार करत होता, किती
मजेचं आहे हे सगळं आणि हा मुलगा
तर खरोखर जादूच्या नगरीतूनच



आलाय. आणि आपला बिजू तर खूषच होता. आपणही काही कमी नाही, अशी जाणीव त्याला झाली होती.

तेवढ्याच त्याच्या लक्षात आलं की साड्यांच्या घड्या करायला, परत पिशवीत भरायला बाप्पांना मदत करायला हवी! तो परत त्या मोठ्या खोलीत गेला. बाप्पा खूष दिसत होते. बाईसाहेबही खूप आनंदात होत्या. त्यांच्याजवळच्या कोचावर खूप मोठा साड्यांचा गठ्ठा होता आणि बाप्पाजवळ पैशाचं बंडल. बाप्पा ते आता रुमालात नीट बांधत होते.

''आई आई ही बघ, या मुलानं मला जादू शिकवली.'' बबल्स मोठ्यांदा म्हणाला. 'गोविंदमामानं मला जे खेळणं दिलं होतं ना - त्यात एका बाजूला या मुलानं कापूस घातला आणि दुसऱ्या बाजूनं निघालं सूत! कमाल आहे ना.''

त्याची आई खळखळून हसत म्हणाली - ''का नसेल तो? या मुलाचे वडीलसुद्धा जादूगारच आहेत. एकापेक्षा एक सरस साड्या विणणारे जादूगार. या वेळच्या थंडीत माझ्या मैत्रिणी जेव्हा या साड्या बघतील आणि विचारतील की कुठून घेतल्या या? तेव्हा मी त्यांना एखाद्या मोठ्या दुकानाचं नाव सांगेन. या अशा साड्या इथे ना कुणाजवळ आहेत, ना असतील!''

बिजूचे बाप्पा विनयाने म्हणाले, ''अहो, यात आमचं काय एवढं कौतुक! जे आजोबा-पणजोबांपासून आम्ही शिकलो ते आता मुलाला शिकवतोय.''

''आणि मी ते पुढे बबल्सदादाला शिकवलं'' बिजू अगदी साधेपणानं म्हणाला. आपल्या वडिलांच्या यशामुळे बिजू जेवढा खुष झाला होता, तेवढ्याचं खुषीनं त्यानं आपल्या नव्या मित्राला मोठ्या भावाचा मान दिला.

बबल्स खोडकरपणे म्हणाला ''आई तू काहीही सांग, मैत्रिणींना; पण मी चरखा कुठे शिकलो असं माझ्या मित्रांनी मला विचारलं तर मी मात्र हेच सांगणार, की संबळपूरजवळच्या जिलमिंडा गावात एक छोटा जादूगार राहतो... त्यानं शिकवलं मला!''



चित्रांविषयी

पटचित्र ही ओरिसामधील पारंपरिक चित्रशैली आहे. पटचित्र काढणाऱ्यांना पटचित्रकार म्हटलं जातं. देवळात हा पट अर्पण करतात. पारंपरिक पद्धतीनुसार चिंचोक्यांची पावडर किंवा खडूची पावडर याचं मिश्रण कापडावर किंवा कागदावर लावून ते कापड आधी कडक केलं जातं आणि त्यावर दगडी रंग, शिंपल्यांचा चुरा किंवा लाख यांच्या सहाय्यानं रंगवलं जातं. आजकाल कापड, रेशीम किंवा ताडाच्या पानावरही पटचित्र काढली जातात. मुख्यतः धार्मिक प्रसंग या चित्रशैलीत रेखाटले जातात आणि देवदेवता, राजा-राणी यांच्या चित्राभोवती ओरिसातली पानं, फुलं, फळं, पक्षी यांची नक्षी असते.

दस्तकारी हाट समिती ही पारंपरिक हस्तकलांमध्ये काम करणाऱ्या कारागिरांचा आर्थिक आणि सामाजिक दर्जा उंचावा म्हणून झटणारी, कारागिरांची मोठी संघटना आहे. विविध सांस्कृतिक अभिव्यक्तींचा परिचय व्हावा यासाठी चार पुस्तकांच्या या मालिकेत त्या त्या स्थानिक शैलीतली चित्रं 'सजावट' म्हणून वापरली आहेत. त्यासाठी युनेस्को, नवी दिल्ली या संस्थेचं सहकार्य मिळालं.

बिजूचं विणकर कुटुंब ओरिसातल्या एका खेड्यात राहतं. हातमागावर ते सुंदर साड्या आणि कापड विणतात आणि शहरांमध्ये किंवा परदेशातही ते विकलं जातं. ही कथा आहे बिजूच्या करामतीची. तो वडिलांबरोबर साड्या विकायला दिल्लीला जातो आणि आपल्या कौशल्यानं एका शहरी मुलाला कसं चकित करतो. ते वाचा.
जया जेटली यांच्या या मजेदार गोष्टीला भ्रमर नायक यांनी पारंपरिक 'पटचित्र' शैलीत चित्रं काढली आहेत.

या मालिकेतील पुस्तके :

बिजूने विणली जादू

बुली आणि वाघ

मनूच्या आनंदाचा घडा.

स्वप्ने भरत जाणारी मुमताज.

टप्याटप्याने वाचायला शिकणे. या पुस्तकाची वाचन पातळी ४ आहे.

१ प्रारंभिक वाचन / मुलांना वाचून दाखवण्यासाठी
वाचायला नुकतीच सुरुवात करणाऱ्या आणि गोष्ट ऐकायला आवडणाऱ्या छोटुकल्यांसाठी.

२ वाचायला शिकणे
ओळखीचे शब्द वाचू शकणाऱ्या आणि मदत घेऊन नवे शब्द वाचणाऱ्या मुलांसाठी.

३ स्वतंत्रपणे वाचन
आपले आपण वाचणाऱ्या मुलांसाठी.

४ सराईतपणे वाचन
आत्मविश्वासानं वाचणाऱ्या मोठ्या मुलांसाठी.

PRATHAM BOOKS
प्रथम बुक्स ही ना-नफा संस्था असून मुलांमध्ये वाचनाची आवड रुजावी यासाठी अनेक भारतीय भाषांमध्ये पुस्तकं प्रकाशित करते.
www.prathambooks.org

Biju Spins Some Magic
(Marathi)
MRP: Rs. 25.00

ISBN 978-93-5022-048-1